निमगांव लघु प्रकल्प, ता. तिरोडा, जि. गोंदिया या योजनेमुळे बाधित होणाऱ्या वनक्षेत्रापोटी वन विभागास प्रदान करावयाची “नक्त मालमत्ता मूल्य” (N.P.V.) रकमेस मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण २२१४/(१३१/२०१४)/लपा-२
मंत्रालय,मुबई-४०००३२
दिनांक:- १४ नोव्हेबर, २०१७.

<u>पहावे</u>:- शासन निर्णय क्र. लपात २३०७/(२६७/०७)/लपा-२, दि. २६.०२.२००८

<u>प्रस्तावना</u> :

निमगांव लघु प्रकल्प हा तिरोडा तालुक्यातील निमगांव गावाजवळ आंबेनाला नाल्यावर स्थित लघु तलाव प्रकल्प असून सदर जलाशयाचे पाणी पूरक कालव्याद्वारे बोदलकसा मध्यम प्रकल्पाचे उजव्या कालव्यामध्ये (६ कि.मी.) सोडण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे नक्षलग्रस्त, आदिवासीप्रधान व मागासलेल्या गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील १५ गावातील ८१८ हे. क्षेत्र सिंचना खाली येणार आहे.

या योजनेकरिता प्रकल्पाच्या १४१.६२ हे. वन जमिन हस्तांतरण प्रस्तावास केंद्र शासनाकडून दि.२३.८.२००६च्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्राप्त झालेली आहे. या योजनेमुळे बाधित होणा-या वनक्षेत्राचे एकुण नक्त मालमत्ता मूल्य (Net Present Value) रुपये २४८८.९४ लक्ष इतके आहे व ते प्रकल्पीय द्वितीय मंजूर सुप्रमा किंमत १८.७६ कोटी पेक्षा जास्त असल्यामुळे एकूण नक्त मालमत्ता मूल्यापैकी संदर्भिय शासन निर्णयानुसार रुपये १०६२.०८ लक्ष रकमेस मंजुरी प्राप्त आहे.

निमगाव लघुप्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या वनजमिनीपोटी होणारा एकूण खर्च प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के पेक्षा अधिक असल्याने बाधित होणाऱ्या वनक्षेत्रापोटी वन विभागास प्रदान करावायाचे नक्त मालमत्ता मूल्य (NPV) रु. १४२६.८६ लक्ष रकमेस मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने दिनांक १९.०९.२०१७ रोजी झालेल्या मागण्या मंत्री मंडळाच्या बैठकीतील निदेशास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

निमगांव लघु पाटबंधारे योजना ता. तिरोडा, जि. गोंदिया या योजनेमुळे बाधित होणा-या १४१.६२ हे. वनक्षेत्राचे एकूण नक्त मालमत्ता मूल्य(एन.पी.व्ही.) रुपये २४८८.९४ लक्ष इतके असून ते प्रकल्पीय द्वितीय मंजूर सुप्रमा किंमत १८.७६ कोटी पेक्षा जास्त असल्यामुळे एकूण नक्त मालमत्ता मूल्य(एन.पी.व्ही.) पैकी संदर्भिय शासन निर्णयानुसार रुपये १०६२.०८ लक्ष रकमेस मंजूरी दिलेली आहे.

निमगाव लघुप्रकल्पाच्या वनजमिनीपोटी होणारा एकूण खर्च किंमतीच्या ५० टक्के पेक्षा अधिक असल्याने बाधित होणाऱ्या वनक्षेत्रापोटी वन विभागास प्रदान करावायाचे नक्त मालमत्ता मूल्य (NPV) रक्कम रु. १४२६.८६ लक्ष वन विभागाकडे जमा करण्यास मंत्रिमंडळाच्या मंजुरीने मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय दि. १९ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११४१५५८१०८३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.11.14 16:01:16 +05'30'

(म. ई. धरणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई ३२
८) अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई ३२.
९) प्रधान सचिव(जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
१३) मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४) मुख्य अभियंता,गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर.
१५) अधीक्षक अभियंता,नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर.
१६) कार्यकारी अभियंता,मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया.
१७) जिल्हाधिकारी, गोंदिया.
१८) ग्रंथालय, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१९) अर्थशाखा १/२ ,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२१) लपा-२, संग्रहार्थ.